रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 1 ] नई दिल्ली, फरवरी 20–26, 2025/फाल्गुन 1-7 (शक) 1946 [खंड 22
No. 1 ] NEW DELHI, FEBRUARY 20-26/PHALGUNA 1-7 (SAKA) 1946 [Vol. 22
अं. १ ] नवी दिल्ली, फेब्रुवारी २०-२६, २०२५/फाल्गुन १-७ (शके) १९४६ [खंड २२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

**विधि और न्याय मंत्रालय**

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि मेइन्टिनन्स् ऑर्डर्स् एन्फोर्समेन्ट ॲक्ट, 1921 ; (2) दि कलेक्शन् ऑफ स्टेटिस्टिक्स ॲक्ट, 2008 ; (3) दि सेन्ट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स् (रिझर्वेशन् इन टिचर्स काडर) ॲक्ट, 2019 ; (4) दि मुस्लिम वुमेन (प्रोटेक्शन् ऑफ राइटस् ऑन मॅरेज) ॲक्ट, 2019 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड़ (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Maintenance Orders Enforcement Act, 1921 ; (2) The Collection of Statistics Act, 2008 ; (3) The Central Educational Institutions (Reservation in Teachers' Cadre) Act, 2019 ; (4) The Muslim Women (Protection of Rights on Marriage) Act, 2019 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि मेइन्टिनन्स् ऑर्डर्स् एन्फोर्समेन्ट ॲक्ट, १९२१ ; (२) दि कलेक्शन् ऑफ स्टेटिस्टिक्स ॲक्ट, २००८ ; (३) दि सेन्ट्रल एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स् (रिझर्वेशन इन टिचर्स काडर) ॲक्ट, २०१९ ; (४) दि मुस्लिम वुमेन (प्रोटेक्शन ऑफ राइटस् ऑन मॅरेज) ॲक्ट, २०१९ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX


| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | निर्वाह आदेशांची अंमलबजावणी अधिनियम, १९२१<br>The Maintenance Orders Enforcement Act, 1921 | ५ |
| २ | आकडेवारी संग्रहण अधिनियम, २००८<br>The Collection of Statistics Act, 2008 | ११ |
| ३ | केंद्रीय शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०१९<br>The Central Educational Institutions (Reservation in Teachers' Cadre) Act, 2019 | २१ |
| ४ | मुस्लिम महिला (वैवाहिक हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९<br>The Muslim Women (Protection of Rights on Marriage) Act, 2019 | २५ |

## मुस्लिम महिला (वैवाहिक हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९

## (२०१९ चा अधिनियम क्रमांक २०)

(४ ऑगस्ट, २०२३ रोजी यथा विद्यमान)

[३१ जुलै, २०१९]

**विवाहित मुस्लिम महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या पतींनी तलाकचे उच्चारण करून घटस्फोट देण्यास मनाई करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

तो, भारतीय गणराज्याच्या सत्तराव्या वर्षी, संसदेकडून, पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, मुस्लिम महिला (वैवाहिक हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९, असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य* खेरीजकरून संपूर्ण भारतभर लागू असेल.

(३) तो, दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

२००० चा २१. (क) " इलेक्ट्रॉनिक स्वरूप " यास, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (द) मध्ये, जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल ;

१९७४ चा २. (ख) " दंडाधिकारी " याचा अर्थ, जेथे विवाहित मुस्लिम महिला राहते त्या क्षेत्रात, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ खालील अधिकारितेचा वापर करणारा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, असा आहे ; आणि

(ग) " तलाक " याचा अर्थ, मुस्लिम पतीने उच्चारण केलेला, तत्क्षणी अंमलात येणारा व रद्द न होणारा घटस्फोट, तलाक-इ-बिद्दत किंवा तलाकचा इतर कोणताही तत्सम प्रकार, असा आहे.

प्रकरण दोन

### तलाकची घोषणा रद्दबातल व अवैध असणे

**३.** मुस्लिम पतीने त्याच्या पत्नीच्या संबंधात, एकतर बोललेल्या किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील किंवा यांसारख्या इतर कोणत्याही रीतीने, शब्दांद्वारे केलेले तलाकचे कोणतेही उच्चारण, रद्दबातल व अवैध असेल. **तलाक रद्दबातल व अवैध असणे.**

**४.** जो मुस्लिम पती, त्याच्या पत्नीच्या संबंधात, कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या तलाकचे उच्चारण करील, तो, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल. **तलाक उच्चारणाबद्दल शिक्षा.**

प्रकरण तीन

### विवाहित मुस्लिम महिलांच्या हक्कांचे संरक्षण

**५.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, जिच्या संबंधात तलाकचे उच्चारण केले असेल अशी विवाहित मुस्लिम महिला, तिच्यासाठी व अवलंबित बालकांसाठी, दंडाधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात येईल अशी निर्वाह भत्त्याची रक्कम, तिच्या पतीकडून मिळण्यास हक्कदार असेल. **निर्वाह भत्ता.**

**६.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, एखादी विवाहित मुस्लिम महिला, तिच्या पतीने तलाकचे उच्चारण केल्याच्या प्रसंगी, दंडाधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात येईल अशा रीतीने, तिच्या अज्ञान बालकांचा ताबा मिळण्यास हक्कदार असेल. **अज्ञान बालकांचा ताबा.**

---

* अधिसूचना क्रमांक. एस.ओ. ३९१२ (इ), दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९ द्वारे, हा अधिनियम जम्मू व काश्मीर संघ राज्यक्षेत्र आणि लडाख संघ राज्यक्षेत्र यांना लागू करण्यात आला.

**अपराध दखलपात्र व आपसात मिटवण्याजोगा असणे, इत्यादी.**

**७.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही,— १९७४ चा २.

(क) जिच्या संबंधात तलाकचे उच्चारण केले असेल त्या विवाहित मुस्लिम महिलेने किंवा तिच्याशी रक्ताचे किंवा वैवाहिक नातेसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने एखाद्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला अपराध घडल्यासंबंधीची माहिती दिली असेल तर, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध हा, दखलपात्र असेल ;

(ख) जिच्या संबंधात तलाकचे उच्चारण केले असेल त्या विवाहित मुस्लिम महिलेच्या विनंतीवरून, दंडाधिकाऱ्याच्या परवानगीने, तो निर्धारित करील अशा अटी व शर्तींवर, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराध हा, आपसात मिटवण्याजोगा असेल ;

(ग) आरोपी व्यक्तीने दाखल केलेल्या अर्जावरून आणि जिच्या संबंधात तलाक उच्चारण्यात आला असेल अशा विवाहित मुस्लिम महिलेचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, अशा व्यक्तीचा जामीन मंजूर करण्यास वाजवी कारण असल्याबद्दल दंडाधिकाऱ्याची खात्री पटल्याशिवाय, या अधिनियमाखालील शिक्षापात्र अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीची, जामिनावर मुक्तता केली जाणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

**८.** (१) मुस्लिम महिला (वैवाहिक हक्कांचे संरक्षण) द्वितीय अध्यादेश, २०१९ याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २०१९ चा अध्या. ४.

(२) असे निरसन झाले असले तरी, मुस्लिम महिला (वैवाहिक हक्कांचे संरक्षण) द्वितीय अध्यादेश, २०१९ अन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा हाती घेतलेली कोणतीही कारवाई ही, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा हाती घेण्यात आलेली कारवाई असल्याचे मानण्यात येईल. २०१९ चा अध्या. ४.

**एस. के. जी. रहाटे,**
सचिव,
भारत सरकार.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.